# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २६/०७/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०८) इतिवृत्त

**बुधवार** दिनांक **२६ जुलै २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी १.१० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. पांडे विनायक प्रभाकर
6. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
7. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
8. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
9. श्री. मो. जावेद मो. इसाक
10. हाजी शेरखान अ. रहेमान

<u>**संवाद :**</u>

श्री.साहेबराव कावडे : माझ्या वॉर्डात लाईट लावले जात नाहीत. टेंडर काढले परंतु कामास सुरूवात केली नाही.

मा. सभापती : निविदा प्रक्रीया पूर्ण झाली असेल तर प्रत्येकांना काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

श्री.दिलीप गायकवाड : माझ्या प्रभागात विद्युत ठेकेदार कोण आहे व कुठे काम केले याची माहिती द्यावी.

कार्य.अभि.(वि.ड्रे.इ.) : 1 एप्रिल 2006 ला सिडकोचे हस्तांतरण मनपाकडे झाले. तेथील देखभाल दुरूस्तीचे काम सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर यांना दिलेले आहे.

श्री.दिलीप गायकवाड : आतापर्यंत त्यांनी एखादे तरी काम केलेले आहे का?

कार्य.अभि.(वि.ड्रे.इ.) : निश्चितपणे अनेक ठिकाणी कामे केलेली आहेत. स.सदस्य श्री.गायकवाड यांचे प्रभागात नेमकी कुठे कामे झालेली आहेत हे तूर्त सांगता येणार नाही.

मा. सभापती : माहिती मागवून सभागृहात सादर करावी.

श्री.रविकांत गवळी : काही समाजकंटकांनी मुर्तीची विटंबना जाणीवपूर्वक केलेली आहे. ही गंभीर स्वरूपाची बाब आहे. हर्सुल येथे मागील सात-आठ वर्षापुर्वी स्मृतिवन विकसित करण्यात आले. त्यात पुतळे बसविण्यात आलेले आहेत. मागील पाच वर्षात या संदर्भात कुणीही दखल घेतलेली नाही. सर्व समाजाचे सर्व धर्माचे या ठिकाणी पुतळे बसविलेले आहेत. पुतळ्यांची विटंबना जाणीवपुर्वक झालेली आहे.

श्री.संजय शिरसाट : महत्वाचा विषय काढालेला आहे, जाणीवपूर्वक विटंबना होत आहे.

मा. सभापती : स्मृतिवन संदर्भात खुलासा करण्यात यावा. मागील दहा वर्षापासून पुतळे धूळ खात पडलेले आहेत. काही गांभीर्य वाटले नाही, काय कार्यवाही केली?

शहर अभियंता : स्मृतिवन येथे वृक्षारोपण करून उद्यान विकसित केले. त्या ठिकाणी अनेक महापुरूषांचे पुतळे बसविलेले आहेत. त्याची देखभाल दुरूस्ती आपण करतो. ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. त्या ठिकाणी मनपाचे कर्मचारी (माळी) नेमलेले आहेत. ते तेथेच राहतात व त्यांना निगा राखण्यासाठी ठेवण्यात आलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : तेथे माळी नाही, काहीही स्वच्छता नाही. लाईट बंद आहेत, गेट नाही, झाडांना पाणी दिले जात नाही, सर्व बेंचेस तुटलेले आहेत.

मा. सभापती : आपण स्वतः स्मृतिवनाला भेट द्यावी. त्या ठिकाणी विद्युत, गेट व इतर व्यवस्था करण्यात यावी. पुतळ्यांची विटंबना व्हायला नको. ज्यांनी जाणीवपुर्वक दूर्लक्ष केले त्यांच्यावर कारवाई करा.

सौ. लता दलाल : मा. आयुक्त व उप आयुक्त यांचे अतिक्रमणाची धाडसी कारवाई केल्याबद्दल अभिनंदन. निराला बाजार येथील अतिक्रमणे काढली, दुकानांसमोरील भाग काढण्यात आले. श्री.नामदेव पवार यांचे देखील अतिक्रमण काढण्यात आले. परंतु याच समोरचे न.भू.क्र.20592 येथील अनधिकृत बांधकाम आहे, तेथील खुली जागा गायब केली. हे सिध्द होऊन देखील प्रशासनाने काय कारवाई केली? नगर रचना विभागाने अहवाल दिलेला नाही का? चुकीची माहिती दिली का. सहा.संचालक नगर रचना यांना न.भू.क्रमांक, क्षेत्र सांगावे लागले. या संदर्भात कारवाईचे आदेश द्यावेत. का कारवाई झाली नाही, याबाबत संबंधीतांचा खुलासा घेण्यात यावा.

मा. सभापती : उप आयुक्त (महसूल) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त (महसूल) : चार पाच संचिका आहेत त्या नगर रचना विभागाकडून मागविलेल्या आहेत. त्या एकमेकांशी संबंधीत आहेत. या प्रकरणात नगर रचना विभागातील अधिकाऱ्यांची मदत अपेक्षीत आहे. अतिक्रमण काढण्याचे काम एप्रिलमध्ये सुरू करण्यात आले होते. एक महिना मी रजेवर होतो. 15-20 दिवसांत होऊ शकेल. नगर रचना विभागाकडून तांत्रिक कामाची मदत मिळाली तर तपासणी होऊन अहवाल समोर येईल व मा.आयुक्तांकडे तसेच सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सौ. लता दलाल : सर्व बाबी तपासण्यात आलेल्या आहेत. फक्त कारवाईची अपेक्षा आहे परंतु कारवाई होत नाही, कुठे थांबलेली आहे?

मा. सभापती : नेमकी कधी कारवाई होणार?

श्री. संजय शिरसाट : कोहीनुर प्लाझा या इमारतीत पार्कींगची जागा आहे त्या ठिकाणी फर्निचरचे शोरूम आहे. ती जागा पार्कीगसाठी आहे की शोरूम साठी आहे याचा खुलासा करावा.

उप आयुक्त (महसूल) : सर्व बाजूची तपासणी व नगर रचना विभागाची चौकशी झाली. आपल्या स्तरावर अभ्यासाला वेळ लागेल. तांत्रिक बाजू तपासणीसाठी तांत्रिक कर्मचारी लागेल. स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांनी कोहीनूर प्लाझा इमारतीच्या संदर्भात विचारणा केलेली आहे. या संदर्भात नगर रचना विभागाकडे बांधकाम परवानगी नकाशाची विचारणा केलेली आहे. उप अभियंता नगर रचना श्री.देशमुख यांना तोंडी सूचना दिलेल्या आहेत. बांधकाम परवानगीची संचिका मिळत नाही तोपर्यंत तपासणी करणे शक्य होणार नाही.

श्री. संजय शिरसाट : उप आयुक्त (महसूल) हे जबाबदार अधिकारी असून त्यांना माहिती मिळत नाही. अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नाही. सहा.संचालक नगर रचना यांना माहिती असेल. त्यांनी स्पष्टीकरण करावे.

स.सं. नगर रचना : कोहीनूर प्लाझाची बांधकाम परवानगी मी येण्यापुर्वी दिलेली आहे.

मा. सभापती : उप आयुक्त (महसूल) यांनी संचिका मागितल्यानंतर का देण्यात आली नाही? आजच्या आज संचिका उप आयुक्त (महसूल) यांच्याकडे पाठविण्यात यावी.

स.सं.नगर रचना : मला आठवत नाही, मी पाहून सांगतो.

श्री.संजय शिरसाट : अतिक्रमण काढण्यासाठी बुलडोझर घेऊन जातात आणि त्यांना जाऊन सांगतात की शटर बंद करा. माहिती देत नाही. पार्कींगच्या जागेवर शोरूम झाले.

मा. सभापती : उप आयुक्त (महसूल) यांच्याकडे संचिका आज पोचवावी. सि.स.नं.20592 संबंधी कारवाई कधी करणार याचा खुलासा करावा.

उप आयुक्त (म) : नगर रचना विभागाकडून आवश्यक कर्मचारी उपलब्ध झाल्यास एक महिन्यात करण्यात येईल.

सौ. लता दलाल : 15 दिवसात कारवाई करण्यात यावी.

मा. सभापती : 15 दिवसांत अहवाल स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा.

श्री.दिलीप गायकवाड : माझ्या प्रभागात मौलाना आझाद शिक्षण संस्थेच्या इमारतीचे काम चालू आहे, बांधकाम परवानगी घेतलेली आहे का? पाठीमागे मोठी जागा असून तेथे अतिक्रमण केलेले दिसते.

स.सं.नगर रचना : मौलाना आझाद शिक्षण संस्थेची जागा सिडको भागात होती. आता सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेले आहे. 1 एप्रिल नंतर बांधकाम परवानगी घेतली आहे काय? तपासणी करण्यात येईल.

मा. सभापती : या संदर्भात पूर्ण माहिती घेऊन पुढील स्थायी समिती सभेत माहिती द्यावी.

श्री.हिंमतराव दाभाडे : आपले अतिक्रमण हटाव की बसाव पथक आहे? तीन चार महिन्यांपासून मी प्रशासकीय अधिकारी श्री.निकम यांना सांगतो. अतिक्रमण हटवले का? परंतु तिकडे दुर्लक्ष होते. मुथीयान कॉर्नर येथील मनपाच्या जागेवर कुंपण भिंत तोडून श्री.तुळशीराम घोरपडे यांनी अतिक्रमण केले. एकनाथनगर विद्युत डिपी ला लागून अतिक्रमण झाले. विद्युत डि.पी.ला अडथळा होतो. फ्युज गेल्यानंतर अंधार होतो. द्वारकापुरी खुल्या जागेमध्ये श्री.शिंदे यांनी कंपौंड वॉल बांधून गाड्या उभ्या करतात. माजी उपमहापौर यांना दुध डेअरीसाठी जागा दिली, त्यांनी शेड बांधले ते काढले, परंतु टपऱ्या बसवल्या. टपऱ्यावाल्याकडून 700-700 रूपये घेतात. ते हटविण्याची मागणी केली परंतु कार्यवाही झाली नाही.

श्री. रविकांत गवळी : 1 एप्रिल 2006 ला सिडको महानगरपालिकेकडे हस्तांतर झाले. सिडकोतील अतिक्रमणे काढण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे की सिडकोची आहे? करारनाम्याप्रमाणे सिडको अतिक्रमण काढून महानगरपालिकेस हस्तांतरण करेल. गरज भासली तर महानगरपालिका मदत करेल असे आहे.

उप आयुक्त (महसूल) : मुथीयान कॉर्नर येथील माहिम 15 दिवसांपुर्वी घेतली होती. टपरी धारकांनी स्वतः काढून घेतले. खुल्या जागेमध्ये बांधकाम परवानगी दिलेली आहे.

श्री.हिंमतराव दाभाडे : 1983 ला त्यांना 3 लाख 25 हजार रूपये मोबदला देण्यात आला. त्यांना बांधकाम परवानगी कशी दिली?

श्री.मो. जावेद कुरैशी : रशीदपुरा, मजनुहिल, खुनी दरवाजा येथील विकास योजना रस्त्यावर अतिक्रमण झालेली आहेत. ते अतिक्रमण हटवले नाही. विकास योजना रस्त्यावरील घरे व अतिक्रमणे काढावीत व तो रस्ता रूंद करावा.

स.सं.नगर रचना : श्री.घोरपडे यांना बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यांनी सोडलेली खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीपेक्षा जास्त सोडलेली आहे. भूमी अभिलेख खात्याचा अहवाल आलेला आहे. सदर प्रकरण 2-3 वेळा स्थायी समितीपुढे आले होते. स्थायी समितीच्या मान्यतेने जागा प्रदान करण्यात आली. त्यावर बांधकाम परवानगी दिली.

श्री.हिंमतराव दाभाडे : मनपाची जागा आहे. तेथे संरक्षित भिंत होती. त्यांची जागा नाही.

मा. सभापती : श्री.घोरपडे यांना दिलेल्या जागे संदर्भातील प्रकरणाची पूर्ण चौकशी उप आयुक्त(म) यांनी करावी. महानगरपालिकेने जागा दिलेली आहे. भूसंपादन किती जागेचे करण्यात आलेले आहे व मोबदला देण्यात आलेला आहे का?

श्री.हिंमतराव दाभाडे : 1983 ला जो चेक दिला आहे त्याचा नंबर आहे. महानगरपालिकेने गेट बांधलेले आहे, कुंपण भिंत केलेली आहे. स्थायी समितीत मनमानी करून ठराव पास करून घेतला आहे.

मा. सभापती : स.सदस्य श्री.रविकांत गवळी यांनी सिडकोच्या संदर्भात विचारलेल्या बाबीचा खुलासा करण्यात यावा.

उप आयुक्त (महसूल) : 1-4-2006 रोजी सिडकोशी जो करार झालेला आहे त्यानुसार जी अतिक्रमणे आहेत ती सिडको काढेल व त्यासाठी जी मदत लागेल ती महानगरपालिका करेल.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिका सांगेल तरच काढू, आपण सांगितले आहे का? अतिक्रमण झाले तसे नमूद केलेले आहे का?

मा. सभापती : सिडको अतिक्रमणाची यादी दिली का, नसेल तर द्यावे.

श्री.पुनमचंद बमणे : हर्सूल येथील नदीच्या पात्रात सुमारे 100-150 घरे आहेत. या संदर्भात मा.आयुक्तांना पत्र दिलेले आहे.

मा. सभापती : त्वरीत कार्यवाही करावी.

| | |
|---|---|
| सौ.लता दलाल | : दि.20-6-2006, दि.4-7-2006 रोजी पत्र देऊन सन 2005-06 मध्ये किती तात्पुरते व किती सेल्फ डेव्हलपमेंटची प्रकरणे मंजूर झाली यासंबंधीची माहिती मागविली होती. या प्रकरणी माझी दिशाभूल करण्याचा प्रयत्न झालेला आहे. सातारा स.नं.75/1 या जागेसाठी मंजूर दिली नाही, प्रलंबीत आहे, नोटीस दिली अशा प्रकारे माहिती देण्यात आली. परंतु प्रत्यक्षात क्र.369 दि.4-3-2006 ला मंजूरी होऊन सेल्फ डेव्हलपमेंटसाठी मंजूर केलेले आहे. परंतु दि.26-7-2006 ला उत्तर दिले आहे की, मंजुरी दिलेली नाही, प्रलंबीत आहे, नोटीस दिली. अशा प्रकारे दिशाभूल करण्याचा प्रयत्न झालेला आहे. या विभागात एजंटस्‌चा सर्रास धुमाकुळ चालू आहे. कर्मचारी, अधिकारी त्यांना मदत करीत आहेत. मी पुरावा दिला, बदली करावी. चुकीची माहिती दिली त्याबद्दल खुलासा घेण्यात यावा. |
| स.सं.नगर रचना | : माहिती वाचून दाखविली ती चुकीची आहे, कबूल करतो. जो खुलासा करण्यात आला त्यात अंतिम ले-आऊट येत नाही. |
| सौ. लता दलाल | : दि.4-3-2006 ला अंतिम मंजुरी दिली व नंतर 20-6-2006 ला पत्राचे उत्तर देण्यात आले व त्यात प्रलंबीत आहे अशी खोटी माहिती दिली जाते. कर्मचारी खोटी माहिती का देतो? एजंटचा सुळसुळाट आहे. त्याचे माध्यमातून असा प्रकार झाला का? |
| स.सं.नगर रचना | : रेखांकनास अंतिम मंजुरी नाही, सेल्फ डेव्हलपमेंटचे आहे. प्रलंबीत आहे ही माहिती चुकीची आहे. |
| मा. सभापती | : जे दोषी असतील त्यांच्यावर त्वरीत कारवाई करावी. पुढच्या सभेत अहवाल देण्यात यावा. संबंधीत कर्मचाऱ्यावर कारवाई करावी. |

**विषय क्र.55 :**

दिनांक 12/7/2006 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त (का.प.क्र.7) कायम करणे.

**ठराव :**

दिनांक 12-7-2006 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.56 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, दि.18.2.2006 च्या सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.195/4 च्या ठरावानुसार शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी रूग्णालय) यंदा सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्यामुळे रूग्णालयातील रूग्णसेवेसाठी आवश्यक असलेले फर्निचर (उदा.कॉट, बेडसाईड लॉकर, पेशन्ट ट्रॉलीज इत्यादी) जुने असल्याने ते बदलण्यासाठी महानगरपालिकेतर्फे रू.20 लाखाची मदत देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे.

सन 2006-07 च्या अर्थसंकल्पात अनुदान वाटपाकरीता रू.25 लक्ष ची आर्थिक तरतुद असून या तरतुदीमधून उपरोक्त रू.20 लक्षची खरेदी महानगरपालिकेच्या विहित पध्दतीचा अवलंब करून निविदेद्वारे करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

| | |
|---|---|
| श्री.मो.जावेद कुरैशी | : मनपास देण्याची गरज का पडते, शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी येतो. |
| मा. सभापती | : शहरातील नागरीकांना फायदा व्हावा म्हणून अनुदान म्हणून देत नाही. महानगरपालिकेची जबाबदारी म्हणून देण्यात येत आहे. |
| श्री.हिंमतराव दाभाडे | : आपण 20 लाख देणार, तेथील परिस्थिती बघितली. पुर्वी विनामुल्य उपचार केले जात होते. आता गरीबांना देखील बाहेरून औषधी आणावयास लावतात. असे असतांना आपण 20 लाख का देतो? |
| श्री.संजय शिरसाट | : आपण एक वषापुर्वीच द्यायला पाहिजे होते. महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी तेथे भेट दिली होती त्यावेळी घाटी रूग्णालयाकडून मागणी झालेली नव्हती. नैतिक कर्तव्य म्हणून व रूग्णांच्या सुविधासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी मदत देण्याबाबत ठरविले होते. ताबडतोब देण्यात यावे. |
| श्री.हिंमतराव दाभाडे | : देण्याबद्दल दुमत नाही. महानगरपालिकेची जबाबदारी नाही का? |
| श्री. संजय शिरसाट | : आपण कॉट, बेडशीटस्, लॉकर, पेशन्ट ट्रॉलीज इत्यादी साहित्य देत आहोत, अनुदान देत नाही. आणि निविदा मागवून देणार आहोत. |

मा. सभापती : विषय क्र.56 मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी रूग्णालय) यंदा सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्यामुळे रूग्णालयातील रूग्णसेवेसाठी आवश्यक असलेले फर्निचर (उदा.कॉट, बेडसाईड लॉकर, पेशन्ट ट्रॉलीज इत्यादी) घाटी दवाखान्यास मदत म्हणून उपलब्ध करून देण्याकरीता रक्कम रू.20 लक्षची खरेदी महानगरपालिकेच्या विहित पध्दतीचा अवलंब करून निविदेद्वारे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.57 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि., वि. इ. व उ.) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.80 मो.अंबिकानगर येथील संतोषीमाता नगर, राजीव गांधी नगर, मुकुंदवाडी येथे अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे सन 2004-05 या वर्षाचे जिल्हा दरसूची नुसार र.रू.12,93,600/- चे अंदाजपत्रक तयार केले असून गुंठेवारी क्षेत्रातील काम असल्याने मा.आयुक्तांनी जी मार्गदर्शक तत्वे ठरवुन दिलेली आहेत त्याचे अधिन राहूनच काम करावे या अटीवर मा.आयुक्तांनी दि.19.6.2006 रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे रक्कम रूपये 12,93,600/- च्या अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात (1) वार्ड-इ भांडवली कामे जलनिःसारण (अ.क्र.7 पेज क्र.129) मधून 3.00 लाख आणि (2) मा.स्थायी समितीने प्रस्तावित केलेल्या यादीतील भांडवली कामे जलनिःसारण पान क्र.157 अ.क्र.37 या लेखातून 10.00 लाख असे 13,00,000/- मधून खर्च करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.मो.जावेद कुरैशी : आपण काम करू शकतो का?

मा. सभापती : नियमानुसार होत असेल तर मान्य.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.80 मो.अंबिकानगर येथील संतोषीमाता नगर, राजीव गांधी नगर, मुकुंदवाडी येथे अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू. 12,93,600/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात (1) वार्ड-इ भांडवली कामे जलनिःसारण (अ.क्र.7 पेज क्र.129) मधून 3.00 लाख आणि (2) मा.स्थायी समितीने प्रस्तावित केलेल्या यादीतील भांडवली कामे जलनिःसारण पान क्र.157 अ.क्र.37 या लेखातून 10.00 लाख असे 13,00,000/- मधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.58 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, शहरातील मंगल केंद्र, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् मधून निघणारा कचरा हा विघटनशील व 24 तासाच्या आत कुजणारा कचरा(बायो डिग्रेबल) असतो. त्यामुळे तो दररोज उचलला जाण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा सुरू करणे आवश्यक आहे. यासाठी खाजगी कंत्राटदारामार्फत हा कचरा गोळा करणे व मनपाने नेमून दिलेल्या जागेवर नेऊन टाकणे यासाठी महानगरपालिका प्रत्येक मंगल कार्यालय, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् यांना खालील प्रमाणे दर आकारणे बाबत प्रस्तावित करीत आहे.

1. मंगल केंद्र
   1. 1000 चौ.फुट क्षेत्रफळा पर्यंत - रू.1000/- प्रति महिना
   2. 1000 ते 3000 चौ.फुट क्षेत्रफळा पर्यंत - रू.2000/- प्रति महिना
   3. 3000 चौ.फुट क्षेत्रफळ व त्यापेक्षा जास्त - रू.4000/- प्रति महिना
2. हॉटेल्स/रेस्टॉरन्टस्
   1. 10 टेबल पर्यंत - रू. 400/- प्रति महिना
   2. 11 ते 25 टेबल पर्यंत - रू. 600/- प्रति महिना
   3. 25 टेबल पेक्षा अधिक - रू.1000/- प्रति महिना
   4. 3 स्टार हॉटेल्स - रू.3000/- प्रति महिना
   5. 4 स्टार हॉटेल्स - रू.4000/- प्रति महिना

6. 5 स्टार हॉटेल्स - रू.5000/- प्रति महिना

उपरोक्त वसूली ठेकेदाराने स्वतःची वाहने वापरून व स्वखर्चाने हा कचरा गोळा करून मनपाने नेमून दिलेल्या जागेवर टाकून करावयाची आहे. यामधून ठेकेदारास जे उत्पन्न मिळेल त्यातून ठेकेदारास रॉयल्टी मनपास द्यावी लागेल. तसेच ठेकेदारास मनपाने दिलेल्या अन्न व भेसळ प्रतिबंधक परवान्याच्या आधारे व 2003-04 च्या केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे हॉटेल्स व रेस्टॉरन्टस्च्या टेबलचा सर्व्हे करावा लागेल. तसेच 2003 च्या नंतर शहरात नविन सुरू झालेले हॉटेल्स व रेस्टॉरन्टस, मंगल कार्यालये यांचाही सर्व्हे करून या प्रकल्पात त्यांना समाविष्ट करावे लागेल.

करीता सदर प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

आरोग्य वैद्य.अधिकारी : रेस्टॉरंट इ.संबंधी 2004 मध्ये सर्व्हे करण्यात आलेला आहे. 1200 हॉटेल्स व रेस्टॉरंटस् आहेत. ओला कचरा 24 तासात सडतो, जास्त घातक आहे. बराच कचरा रस्त्यावर आजुबाजूला पडलेला असतो. त्यामुळे माशा वगैरे होऊन गॅस्ट्रोसारखे रोग होण्याची शक्यता असते. मनपाकडे हा कचरा उचलण्याची योग्य सोय नाही. एक-दोन किटमध्ये उचलता येत नाही.

श्री.रविकांत गवळी : 2002-2003 मध्ये सर्व्हे झाला तो योग्य आहे की नाही?

सौ. लता दलाल : जे दर दिले ते 50% करावेत. हॉटेल किती कॅटेगिरीत आहेत त्याची माहिती देण्यात यावी.

श्री.संजय शिरसाट : मंगल कार्यालयास परवानगी दिली नाही तर यात कसे नमूद केले? अभिलेखाप्रमाणे बांधकाम परवानगी दिलेली आहे का?

स.सं.नगर रचना : मंगल कार्यालयास परवानगी दिलेली नाही.

मा. सभापती : स.सदस्यांनी दर जास्त आहेत ते कमी करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. हॉटेल्स, रेस्टॉरंटमधील अ.क्र.1 ते 3 मध्ये दुरूस्ती करून दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील मंगल केंद्र, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् मधून निघणारा कचरा हा विघटनशील व 24 तासाच्या आत कुजणारा कचरा(बायो डिग्रेबल) असल्यामुळे तो दररोज उचलला जाण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा सुरू करण्यासाठी खाजगी कंत्राटदारामार्फत हा कचरा गोळा करणे व मनपाने नेमून दिलेल्या जागेवर नेऊन टाकणे यासाठी महानगरपालिका प्रत्येक मंगल कार्यालय, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् यांना खालील प्रमाणे दर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रस्तावात दर्शविलेल्या अटी शर्तीस अधीन राहून किरकोळ फेरबदलासह खालील दर्शविलेल्या दराने ठेकेदाराने स्वतःची वाहने वापरून व स्वखर्चाने हा कचरा गोळा करून मनपाने नेमून दिलेल्या जागेवर टाकून वसूली करण्यास मंजुरी देण्यात येते.

1. मंगल केंद्र
   1. 1000 चौ.फुट क्षेत्रफळा पर्यंत - रू.1000/- प्रति महिना
   2. 1000 ते 3000 चौ.फुट क्षेत्रफळा पर्यंत - रू.2000/- प्रति महिना
   3. 3000 चौ.फुट क्षेत्रफळ व त्यापेक्षा जास्त - रू.4000/- प्रति महिना
2. हॉटेल्स/रेस्टॉरन्टस्
   1. 10 टेबल पर्यंत - रू. 100/- प्रति महिना
   2. 11 ते 25 टेबल पर्यंत - रू. 300/- प्रति महिना
   3. 25 टेबल पेक्षा अधिक - रू. 500/- प्रति महिना
   4. 3 स्टार हॉटेल्स - रू.3000/- प्रति महिना
   5. 4 स्टार हॉटेल्स - रू.4000/- प्रति महिना
   6. 5 स्टार हॉटेल्स - रू.5000/- प्रति महिना

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.59 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता शहरात विविध विषयांवरती डाक्युमेंट्रीज बनविल्या जातात. तसेच अनेक चित्रपटांचे, सिरियल्सचे चित्रीकरण शहरात केले जाते. कला, सांस्कृतिक क्षेत्रास प्रोत्साहन मिळण्याच्या

दृष्टीकोनातून या उद्योगास महापालिकेच्या विविध करातून सुट देण्याचा तसेच चित्रिकरणासाठी महानगरपालिकेच्या इमारती, ऐतिहासिक इमारती, उद्याने, म्युझीयम्स, सभागृहे, संशोधन केंद्रे, रस्ते तसेच इतर मालमत्ता प्रशासकीय सोयीनुसार पुढील दोन वर्षासाठी विनाशुल्क उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कला, सांस्कृतिक क्षेत्रास प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीकोनातून चित्रपट उद्योगास महापालिकेच्या विविध करातून सुट देण्याचा तसेच चित्रिकरणासाठी महानगरपालिकेच्या इमारती, ऐतिहासिक इमारती, उद्याने, म्युझीयम्स, सभागृहे, संशोधन केंद्रे, रस्ते तसेच इतर मालमत्ता प्रशासकीय सोयीनुसार पुढील दोन वर्षासाठी विनाशुल्क उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.60 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको व शहराच्या विविध प्रभागामध्ये स.नगरसेवक स्वेच्छा निधीतून तसेच अन्य लेखाशिर्षकातून मागणी प्रमाणे विंधन विहीर खोदून हातपंप बसविण्याच्या कामासाठी एक वर्षासाठी दर निश्चीत करणे आहे.

या कामासाठी निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या नियोजित तारखेस चार सिलंबद निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. मे. उपासना बोअरवेल, औरंगाबाद | 7.9% जास्त दराने |
| 2. मे. यश बोअरवेल, औरंगाबाद | 9% जास्त दराने |
| 3. मे. तिरूपती बोअरवेल, नाशिक | 15% जास्त दराने |
| 4. मे. असन्सो लाईट, औरंगाबाद | निविदा उघडण्यात आली नाही. |

प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या मे.उपासना बोअरवेल्स, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.9% जास्त असे आहेत. सदरील दर जास्तीचे असल्यामुळे एजन्सीसोबत वाटाघाटी करण्यात आल्या, त्यात त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराप्रमाणे करण्यास संमती दिली आहे. हे दर एक वर्षासाठी बंधनकारक राहतील. मागणी प्रमाणे व आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रस्ताव सादर करून हातपंप बसविण्याची कामे करण्यात येतील.

तरी मे.उपासना बोअरवेल्स, औरंगाबाद यांची सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराप्रमाणे निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको व शहराच्या विविध प्रभागामध्ये स.नगरसेवक स्वेच्छा निधीतून तसेच अन्य लेखाशिर्षकातून मागणी प्रमाणे विंधन विहीर खोदून हातपंप बसविण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.उपासना बोअरवेल्स, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.61 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत दिल्लीगेट सभोवताली डॉ.रफीक झकेरिया यांचे स्मरणार्थ वाहतुक बेट विकसित करणे या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसूचीनुसार व आजच्या बाजारभाव दराप्रमाणे रक्कम रू.52,67,000/- चे अंदाजपत्रक मौलाना आझाद ट्रस्ट यांनी सादर केलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदान रक्कम रू.10,00,000/- व महानगरपालिकेतर्फे रक्कम रू.5,00,000/- असे एकूण रक्कम रू.15,00,000/- पर्यंतच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास व वाहतूक बेटास डॉ.रफीक झकेरिया यांचे नामकरण करण्यास मा.सर्वसाधारण सभा दि.24-5-2006 मध्ये ठराव क्र.249/3 नुसार मान्यता मिळालेली आहे. एकूण खर्चाच्या रक्कमेपैकी उर्वरित र.रू.37,67,000/- हे मौलाना आझाद शैक्षणिक ट्रस्ट यांनी खर्च करण्याची लेखी संमती दिलेली आहे. सदर वाहतुक बेट तयार केल्यानंतर भविष्यात त्याची देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी सदर ट्रस्टची राहणार आहे व त्यासाठी ट्रस्ट उद्यान देखभाली करीता प्रशिक्षित असा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देणार आहे. काम महानगरपालिकेच्या देखरेखीखाली पूर्ण करून घेण्यात येईल.

तरी सदर वाहतुक बेट उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्यानुसार संबंधीत मौलाना आझाद ट्रस्ट तर्फे महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीसह विकसीत करण्याच्या प्रस्तावास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

संवाद :

मा. सभापती : या प्रस्तावाच्या संदर्भात श्रीमती फातमा झकेरीया यांचेकडून पत्र प्राप्त झालेले आहे. नगर सचिव यांनी याबाबत माहिती द्यावी.

नगर सचिव : सदर प्रस्तावाच्या संदर्भात श्रीमती फातमा झकेरीया यांनी मा.सभापती यांनी पत्र देऊन कळविले आहे की, सदर प्रस्तावात दर्शविलेली उर्वरीत रक्कम रू.37,67,000/- इतका खर्च मौलाना आझाद शैक्षणिक ट्रस्ट खर्च करणार नसून त्या स्वतः आणि त्यांचे कुटुंबामार्फत हा खर्च करण्यात येणार आहे. तशी दुरूस्ती करण्याबाबत विनंती केलेली आहे.

मा. सभापती : दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत दिल्लीगेट सभोवताली डॉ.रफीक झकेरिया यांचे स्मरणार्थ वाहतुक बेट विकसित करणेकरीता 2006-07 या आर्थिक वर्षात एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदान रक्कम रू.10,00,000/- व महानगरपालिकेतर्फे रक्कम रू.5,00,000/- असे एकूण रक्कम रू.15,00,000/- पर्यंतच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास तसेच एकूण खर्चाच्या रू.52,67,000/-रक्कमेपैकी उर्वरित र.रू.37,67,000/- इतका खर्च श्रीमती फातमा झकेरीया व डॉ.झकेरीया यांचे कुटुंबिय करणार असून वर नमूद केल्यानुसार मनपाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीसह सदरील वाहतुक बेट विकसित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.62 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत स्वातंत्र्यसेनानी पद्मविभूषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचा पुर्णाकृती पुतळा तयार करून घेणेसाठी मुंबई येथील शिल्पकार 1) उत्तम पाचारणे, 2) इंद्रजीत यादव यांच्याशी दुरध्वनीवरून पुर्णाकृती पुतळा ब्रॉंझ धातुमध्ये तयार करणे बाबत दरपत्रक मागविले असता त्यापैकी श्री.उत्तम पाचारणे यांनी दरपत्रक पाठविले परंतु श्री.इंद्रजीत यादव यांनी प्रतिसाद दिलेला नाही. सदर 9 फुट उंच ब्रॉंझ धातूचा पुतळा तयार करणे करीता श्री.उत्तम पाचारणे यांनी रक्कम रू.8,50,000/- असा दर दिलेला आहे. पुतळ्यासाठी लागणाऱ्या चबुतऱ्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.2,50,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-2007 या आर्थिक वर्षात एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदान रक्कम रू.10,00,000/- व महानगरपालिकेतर्फे रक्कम रू.1,00,000/- मधून करण्यात येत आहे.

श्री.उत्तम पाचारणे, शिल्पकार, मुंबई यांच्याकडून सदर पुतळा रक्कम रू.8,50,000/- मध्ये करण्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली असून प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव पाठविण्याचे आदेशित केलेले आहे. तरी एकूण अंदाजपत्रक रक्कम रू.11,00,000/- चे व पुतळ्याचे काम श्री.उत्तम पाचारणे, शिल्पकार, मुंबई यांचेकडून करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

संवाद :

सौ. लता दलाल : सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे आलेले नाही.

मा. सभापती : तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.63 :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना दर वर्षी प्रत्येकी दोन गणवेष दिले जतात. तथापि मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २५९/१ दि. २४.५.२००६ अन्वये शालेय विद्यार्थ्यांना दोन रंगीत जेड व एक पांढरा जेड गणवेष

देण्याबाबत ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार ॠीरू ठशव उालिळरींळीं चा चौकडा व ग्रे रंगाची हाफ पँट या प्रमाणे रंगसंगती निश्चित करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने गणवेष खरेदीकरिता दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दैनिक लोकमत, दैनिक सामना या वर्तमान पत्रात जहिरात प्रसिध्द करण्यात आली होती व दि. ०५.०६.२००६ ते दि. १२.०६.२००६ पर्यंत निविदांची विक्री करण्यात आली व दिनांक १५.०६.२००६ रोजे निविदा स्विकारण्यात आल्या. एकुण १० निविदा दरपत्रकांची विक्री झाली व या कार्यालयास एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. त्यांचे कागदपत्रांचे पहिले पाकिट (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात आले. मे. जय इन्टरप्रायजेस, मुंबई यांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांची निविदा नाकारण्यात आली. उर्वरित तिन निविदाधारक

(१) क्रिस्टल रेडिमेड, औरंगाबाद

(२) मे. शुभम इन्डस्ट्रिज, पैठण

(३) मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद

यांनी दिलेल्या गणवेष कापडाच्या नमुन्यावर अतिरिक्त शहर अभियंता, शिक्षणाधिकारी, मुख्य लेखाधिकारी व मा. आयुक्त यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन व नमुने मोहोरबंद करून दि.१९.६.२००६ रोजी शासन मान्य प्रयोग शाळा मे. केन्द्रीय कपास प्रौद्योगिक अनुसंधान संस्थान, माटुंगा, मुंबई यांचेकडे तपासणी करिता पाठविण्यात आल्या.

दिनांक ३०.६.२००६ रोजे सदर संस्थेकडून मोहोरबंद केलेला तपासणी अहवाल प्राप्त झाला. त्यानुसार पांढरे कापड (सुटींग व शर्टिंग) हे कार्यालयाने ठरवून दिलेले निकष ९७ ते ९८% पुर्ण करतात. तथापि रंगीत कापड (सुटींग व शर्टिंग) हे निकष पुर्ण करीत नसल्याचे दिसून आले.

तथापि १५ ऑगस्ट २००६ पूर्वी शालेय विद्यार्थ्यांना गणवेष देण्याच्या सन्माननिय पदाधिकारी यांच्या सुचना आहेत. प्राप्त निविदा नाकारल्यास फेर निविदेकरिता लागणारा कालावधी खुप जस्त होता. त्यामुळे मा. आयुक्त यांचेशी विचारविमर्श करण्यात आला. त्यानुसार तिनही निविदा धारकाकडून गणवेष पुरवठा करतांना मनपाने निविदा सुचनेत दिलेले निकष १००% पुर्ण करणारे साहित्य पुरवठा करण्यास बांधील असल्याचे १०० रूपयाच्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र घेऊन त्यांचे निविदा दर पत्रकांचे दुसरे पाकिट उघडण्यात आले. त्यांचा प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जेडलेला आहे. त्यानुसार मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचे दर हे प्राप्त दरांत सर्वात कमी होते. त्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे समक्ष पुनश्चः तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दर असलेले मे. एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांच्या सोबत प्राप्त दर कमी करणे बाबत वाटाघाटी केल्या असता त्यांनी निविदेत दिलेल्या दरापेक्षा १३% कमी दराने वरील अटीच्या अधीन राहून पुरवठा करण्याचे मान्य केले.

उपरोक्त प्रमाणे दरास मा. आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. विद्यार्थी संख्येत ५% अपेक्षित वाढ होऊ शकते त्यामुळे अंदाजित खर्चात वाढ होऊ शकते.

उपरोक्त प्रमाणे प्रती विद्यार्थी तिन गणवेषाकरिता अंदाजित खर्च रू.१०९.०० लक्ष येणे अपेक्षित आहे. गणवेष खरेदी या शिर्षांतर्गत अंदाजपत्रकीय तरतुद रू.५०.०० लक्ष एवढी ठेवण्यात आलेली आहे. तथापि यावर्षी विद्यार्थ्यांना पुरवावयाच्या गणवेषांची संख्या वाढल्यामुळे खर्चाच्या रक्कमेत वाढ झालेली आहे. त्यामुळे रू.५९.०० लक्ष वाढीव खर्च लागणार आहे. गणवेष पुरवठ्या करिता येणाऱ्या वाढीव खर्चास तरतुद करण्याकरिता मा. सर्वसाधारण सभेने मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार वाढीव रक्कम रू.५९ .०० लक्ष तरतुद करण्यास्तव तसेच मे.एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांची सर्वात कमी दराची व निविदेत दिलेल्या दरापेक्षा १३% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व मान्यतेस्तव प्रस्ताव सादर. (सोबत-

प्राप्त सर्वात कमी दराच्या मे.एमएसएसआयडीसी यांचे निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता व निविदा दरानुसार येणाऱ्या खर्चाचे विवरण)

**संवाद :**

मा. सभापती : पुढील वर्षी शैक्षणिक वर्ष सुरू होतांना जुन महिन्यात गणवेश पुरविण्यात यावेत. त्याकरीता आवश्यक निविदा प्रक्रीया मे महिन्यातच पूर्ण करण्यात यावी व शाळा सुरू होताच गणवेश पुरवठा करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना दोन रंगीत जोड व एक पांढरा जोड गणवेश पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार निविदेत दिलेल्या दरापेक्षा 13% कमी दराने सदरील गणवेश पुरवठ्याचे काम मे.एम.एस.एस.आय.डी.सी. औरंगाबाद यांचेकडून करुन घेण्यास तसेच प्रती विद्यार्थी तीन गणवेश पुरवठ्यासाठी एकुण खर्च अंदाजे 109 लक्ष येणार असल्याने वाढीव 59 लक्षची तरतुद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.64 :**

उप आयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, पडेगांव कत्तलखाना परिसरात यापुर्वी वसाहतीसाठी परवानाधारक खाटीकांना 203 प्लॉट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर प्लॉटपैकी एकूण 152 परवाना धारकांकडून पैसे जमा करण्यात आले असून त्याची यादी सोबत जोडली आहे, त्यास मंजूरी व्हावी.

या वसाहतीच्या दक्षिण बाजूस काही जागा भविष्यकाळात प्लॉट घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता असल्याने ठेवण्यात आली होती. या जागेमध्ये 20' x 30' चे भूखंड हे पडेगांव कत्तलखाना येथे जनावरे कत्तल करणारे मजूर (कमोत्री) यांना देण्याबद्दल प्रस्ताव सादर करत आहे. ज्यामुळे जनावरे कत्तल करणारे मजुरांचे सदर वसाहतीत स्थलांतर होईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

सौ.लता दलाल : सदर प्रस्ताव मंजुरीला विरोध नाही. या प्रस्तावा संदर्भात खुलासा करण्यात यावा. जे यात बसणारे त्यांनाच देण्यात यावे. नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे.

मा. सभापती : शहरात अवैध कत्तल रोखण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे. सदर प्रस्तावास मंजूरी देणे आवश्यक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना परिसरात यापुर्वी वसाहतीसाठी परवानाधारक खाटीकांना 203 प्लॉटपैकी ज्या परवानाधारक खाटीकांनी पैसे जमा केले अशा एकूण 152 परवाना धारक खाटीकांना जागेमध्ये 20' x 30' चे भूखंड हे पडेगांव कत्तलखाना येथे जनावरे कत्तल करणारे मजूर (कमोत्री) यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा. सभापती : जुन्या वाहनांचा व साहित्याचा लिलाव करण्यासाठी लिलाव समितीमध्ये स्थायी समितीचे डॉ.आशा बिनवडे, श्री.साहेबराव कावडे व श्री.मो.जावेद कुरैशी यांचा समावेश करण्यात येतो.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद